# राशिभविष्य - मे, २०१२.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==============================================================

**(१)** मेष - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ साधारण बरा जाईल. पण विविध कारणांनी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असल्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणे. संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर संयम व सहनशील बनून मन शांत राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळास टक्कर देणे शक्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना आर्थिक स्वरूपाची चिंता सहन करावी लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने विविध मार्गांनी अर्थलाभ होईल व आर्थिक चिंता दूर होईल. तसेच कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभेल. मुलांपैकी कोणाचा आजार, कोणाचे गैर आचरण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख लाभणे कठिण दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री शनिमुळे दिनांक १५-१६, आणि ३०-३१ हे चार दिवस जपा. असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. इतर दिवशी ह्या शनीमुळे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली, हिशेब, शास्त्रीय संशोधन असे कार्यक्षेत्र असणारांना लाभदायक होईल. तसेच कोळसा, खाणउद्योग, यांनाही अनुकुल होईल. मंगळामुळे वैद्यकीय व्यवसाय, औषध निर्मिती वा विक्री असे व्यापार-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल.

**(२)** वृषभ - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध व नंतर दिनांक २० पर्यंतचा काळ अतिशय प्रतिकुल आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी या काळात अत्यंत सावधानतेने, विचारपूर्वक असे आचरण जीवनाच्या सर्वच अंगांबाबत करावे. कारण प्रथम शनि-रवि योग व नंतर शनि-चंद्र योग असह्य मनस्ताप दिण्याची शक्यता दिसते. जपा. वैवाहिक जीवनातही स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्येमुळे सुखसमाधान मिळणे शक्य होईलसे दिसत नाही.पण आरोग्यविषयक समस्या नसेल तर मात्र शुक्राच्या अनुकुलतेने वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल दिनांक २० नंतरचा काळ हाच शनि चिकित्सक बौद्धिक व्यावसायिकांना, कोळसा, खाण व्यावसायिकांना अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक होईल. मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे यामुळे अपेक्षित गृहसौख्य मिळेलच असे सांगता येणार नाही. राहत्या वास्तूसंबंधी वा जागेसंबंधी समस्या त्रस्त करतील. जपा.रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरुच्या अनुकुलतेने आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही, असे वाटते. या राशीच्या विद्यार्थ्यांनी मित्रांशी भांडणे टाळून व आळस वा जडत्व झटकून

मनापासून अध्ययन केले तरच घेतलेल्या परिश्रमाचे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल तर व्यापार-व्यावसायिकांना अस्थिर परिस्थितीला सामोरे जावे लागेल. पण मानसिक आजार तज्न्य व द्रव पदार्थाचे व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल.

**(३)** मिथुन - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल असणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा, गुरु- नेपच्यून पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच समाजकार्याची आवड असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अनारोग्यामुळे, किंवा कसल्या तरी मानसिक त्रासामुळे मनापासून अध्ययन करणे जमेलसे वाटत नाही. त्याचप्रमाणे या राशीच्या मंडळींना विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात व गहसौख्यात बाधा येणे शक्य दिसते. पण मधून मधून शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्य, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते असे कार्यक्षेत्र असणाऱ्या मंडळीना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महत्त्वाकांक्षा वाढेल. पण स्वभाव लहरी होणे संभवते. त्याला अंकुश घालता आला पाहिजे. या राशीच्या व्यापारी मंडळीना परधर्मीयांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येण्याची दाट शक्यता आहे.

**(४)** कर्क - या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना या महिन्याचा काळ "घेता किती घेशिल दो करांनी " असे म्हणता येईल इतका मनोनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईलसे दिसते. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, शास्त्रीय संशोधनक्षेत्र, वकिली-सल्लागारी व्यवसाय, दलाली वा कमिशनवर व्यवसाय असणारांनाही काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काहींना मानसन्मानाचे योग संभवतात. या उलट खाजगी नोकरीत असणारांना मात्र कठोर परिश्रम करूनच खर्चाची हातमिळवणी करण्याचा प्रयत्न करावा लागेल. काहींना अनपेक्षित येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडताना थकावट जाणवेल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून घसा, दाढा, मान दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात शनिमुळे स्थावरसंबंधी वाद, गैरसमज अशापैकी काही कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते.पण शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती फ़ारशी न बिघडता अटोक्यात राहील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही युवकाना उत्तम नोकरी मिळू शकेल;तर काहींना नवे कार्यक्षेत्र मिळेल. पण

एखाद्या भावंडाबाबत चिंता करावी लागेल अशी समस्या निर्माण होणे संभवते. तसेच विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात.

**(५)** सिंह - नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या युवकयुवतींना मनपसंत नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. पण दिनांक ४-५ या दोन दिवशी अनपेक्षितपणे मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे.. जपा. एखादी भावंडविषयक समस्या चिंताग्रस्त करीलसे दिसते. कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, गैरसमज, अनिष्ट घटना अशापैकी कारणांनी तर वैवाहिक जीवनात दोघांपैकी कोणा एकाचे वा दोघांचेही अनारोग्य, मतभेद, वाद अशापैकी कारणानी सुखसमाधान मिळणे अशक्य होईलसे दिसते. जपा. या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव मानी, अहंकारी, हट्टी, हटवादी अशा प्रकारचा असल्याने त्यांना या महिन्यातील विरोधी परिस्थितीला तोंड देताना खूप श्रम, दगदग सहन करावी लागणार आहे. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केलेत तर खूपच सुखाचे होईल व अनारोग्यही होणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री शनि या राशीच्या धनस्थानी येईल व तो आर्थिक बाबतीत चिंता निर्माण करण्याची शक्यता दिसते. विशेष करून कोर्टप्रकरणे किंवा कुटुंबातील कोणाचे गंभीर आजारपण अशापैकी कारणांनी चिंता उत्पन्न होईलसे दिसते. अपघातभय असल्याने सदैव सावधानतेने आचरण करा. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, शास्त्रीय संशोधन क्षेत्र अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्तरार्ध सर्व प्रकारे प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण यांत्रिकतांत्रिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना अडचणींना तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. जपा.

**(६)** कन्या - या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण ग्रहमान बरेचसे प्रतिकुल असेच असणार आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सतत मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडतीलसे दिसते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जीवनातही दोघांपैकी एकाचा लहरी, विक्षिप्त स्वभाव, मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी बाधा निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळीना फ़सवणुकीचा तर काहींना काल्पनिक चिंतांचा त्रास सहन करावा लागेल. काहीना उगीचच आजारभावनेमुळे नैराश्य येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना महिन्याचा उत्तरार्धच शैक्षणिक प्रगतीस अनुकुल असेल. वक्री शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घड्ण्याची

शक्यता आहे. जपा. स्वतःचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी मानसिक आरोग्य उत्तम राखावे लागेल. अति विचार करू नका, नवीन काही करण्याचे धाडस करू नका, मंगळामुळे जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास व चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येणे संभवते. अशा सर्व विरोधी परिस्थितीत गुरु-शुक्र या दोन शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा असह्य मनस्ताप सुसह्य होईल. जन्मकूडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे शक्य दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना प्रवासाचे योग येतील

**(७)** तूळा - सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत चंचल व भावनाशील झाले असावे, असे वाटते. त्यामुळे शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट ध्यानात ठेवूनच सदैव सावधानतेने आचरण करा आणि मन शांत व स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे मनाला प्रतिकुल असलेल्या घटना घडल्या तरी नैराश्य येणार नाही. कौटुंबिक जीवनात स्वतःचे, जीवनसाथीचे वा मुलांपैकी कोणाचे अनारोग्य वा स्थलांतर अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ राहण्याची शक्यता दिसते. शिवाय आर्थिक समस्येमुळे या राशीची काही मंडळी चिंताग्रस्त होतीलसे दिसते. या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार, मुखदंत रोग, डोकेदुखी, अपचन, पोटविकार, अशापैकी कसल्या तरी आजाराचा त्रास सहन करावा लगेलसे दिसते. काहींना मुदतीच्या तापाचा आजार सहन करावा लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही.. अकारण काल्पनिक चिंता करू नका व अति विचार करू नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. तसेच दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करण्याने मन खंबीर बनेल. अशाही परिस्थितीत गुरुच्या अनुकुलतेने नवे स्नेहसंबंध वा प्रेमसंबंध जुळून येण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरून संपन्न होणेही संभवते. व्यापारी मंडळीना व चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मपत्रिकेत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना महिन्याच्या उत्तरार्धात धनलाभे होणे शक्य आहे. काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ तर काहीना भूमिलाभ होणे संभवते. पण महिन्याचा उत्तरार्धच अधिक मनस्ताप देणारा असल्याचा अनुभव येईल. जपा.

**(८)** वृश्चिक - या राशीच्या मंडळीना तुलनात्मक दृष्ट्या या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने बरा असला तरी कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. वरिष्ठांशी वाद, मतभेद होणे संभवते. काहींना नवीन काही तरी करण्याची ऊर्मी येईल.

स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या कामकाजात अडचणी, अडथळे निर्माण होतील. जपा. पण महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या व्यापारी मंडळींना बरा असला तरी इतरांना मात्र मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. गैरसमज, वाद, मनस्ताप यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे गैर आचरण अशापैकी कारणांनी महिन्याच्या उत्तरार्धात संततिसुखात बाधा येणे शक्य दिसते. पण या राशीच्या विद्यार्थ्यांना व चिकित्सक बौद्धिक व्यवसाय व शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात दाम्पत्यजीवनातील सुखसमाधानात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. पण या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाहही ठरण्याची शक्यता आहे. शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे ही बाब सतत ध्यानात ठेवून, संतापी स्वभावाला संयम व सहनशीलतेचा लगाम घालून आचरण केलेत तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेशाची उपासना व हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(९)** धनु - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ काही बाबतीत अनुकुल तर काही बाबतीत प्रतिकुल असणार आहे. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल व सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या पूर्वार्धात संततीचे आजार, स्वत:चे अनारोग्य व अन्य कारणानी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाशील झाले असावे, असे दिसते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेसेही काही घडले तरी ही मंडळी लगेच अस्वस्थ होत असावीत, असे वाटते. पण श्रद्धेने गुरु दत्तात्रेयेची उपासना केल्यास मन सशक्त राहू शकेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे विशेष प्रकारची मन:शक्ती प्राप्त होणे शक्य आहे. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाची तर काहीना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. पण अशा प्रवासात त्रास व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे..जपा. महिन्याचा पूर्वार्ध चिकित्सक बौद्धिक व्यवसायास तर उत्तरार्ध कोळसा, खाणउद्योग, वकिली-सल्लागारी अशा प्रकारच्या व्यावसायिकाना व शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात व गृहसौख्यात बाधा येणे शक्य आहे. जपा.

**(१०)** मकर - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे होईल. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक जीवनात विविध मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने मनस्ताप सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात अपघातभय आहे. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या

विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण अनारोग्य वा कसल्या तरी मोहात मन व बुद्धी अडकून काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होण्याची शक्यताही दिसते. तसेच शुक्राच्या अनुकुलतेने नवे स्नेहसंबध वा प्रेमसंबंध जुळून येण्याची शक्यता दिसते. नोकरी-व्यवसायात आर्थिक लाभ होतील. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्य, कोळसा व्यापार, खाण उद्योग असे कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. असे असले तरी आर्थिक लाभास विलंब, घोटाळे निर्माण होणे संभवते. त्यामुळे व्यावसायिक आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याबाबत चिंता करावी लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या मंडळीना सहज रीत्या वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. राहू-केतुमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात दूरच्या प्रवासाचे योग येतील.

**(११)** कुंभ - या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन व बुद्धी अतिशय चंचल, अस्थिर, लहरी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी मूक व्रत धारण करूनच सतत आचरण करावे, असे सांगावेसे वाटते. शिवाय हातून अविचाराने खर्च होणे, विक्षिप्त आचरण होणेही संभवते. मानसिक संवेदना शीघ्र असल्याने मनाविरुद्ध काहीही घडल्यास लगेच गहरे नैराश्य येणे शक्य आहे. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काहीना प्रवासयोग संभवतात. भावंडापैकी कोणाकडून मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुबिक सुखात वाधा येईल. जपा. पण शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या ज्या मंडळींचा बागायत शेती व्यवसाय आहे, अशांना या महिन्याचा संपूर्ण क्‍ाळ लाभदायक जाईल. दांपत्यजीवनात दोघांपैकी एकाचे अनारोग्य, मतभेद, अन्य कारणे यामुळे अपेक्षित सुखसमाधान मिळणे कठिण होईल. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यानी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. संयमाने वागा.

**(१२)** मीन - सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत चंचल, लहरी व विक्षिप्त असा झाला असण्याची शक्यता जाणवते. कोणीही उपदेश केला वा समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर अपमान झाल्यासारखे वाटून संताप येत असावा. अशा परिस्थितीत या महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे या राशीच्या मंडळीची शारीरिक

उष्णता भडकून डोळ्याची दुखणी, ताप येणे, इजा होणे, फ़ोड येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार निर्माण होणे संभवते. जपा. आप्तेष्टांशी अकारण वादविवाद टाळा. मन व बुद्धीवर ताबा ठेवला नाहीत तर हातून अविचाराने काहीही होऊ शकेल. फ़सवणूक होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. चोरीमुळे वा हातून चुका झाल्यामुळे आर्थिक हानी होणे शक्य आहे. जपा. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच असेल. तसेच या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ तरा काहीना मान-प्रतिष्ठा प्राप्त होणे शक्य आहे. साहित्यिकांचे अप्रकाशित साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषधविक्रेते अशा सर्वांना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रगतिकारक व लाभदायक होईल. विविध कारणांनी वैवाहिक जीवतातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते.

=====ooooo=====